**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक १ याची जबानी सत्यप्रतिज्ञेवर सुरु.</u>**

मोटार अपघात नुकसान भरपाई
अर्ज क्र.१००/२०२१
जुना M.A.C.P. क्र.११५/२०१६
बाबुराव –वि.– दिलीप
<u>निशाणी क्र.१९ खाली</u>

**<u>पुढील सरतपास– अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. एम.वाय.पठाण यांचेमार्फत शपथेवर सुरु...</u>**

१२. शपथपत्र माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आलेले असुन त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर मी सही केली आहे. एफ.आय.आर.ची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२१</u>** वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२२</u>** वर आहे. मोटरसायकल क्र.एम.एच.२८ एजी १७१३ च्या नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत **<u>निशाणी क्र.२३</u>** वर आहे. मोटरसायकल क्र.एम.एच.२८ एजी १७१३ च्या विमा कागदपत्रांची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२४</u>** वर आहे. मोटर वाहन अपघातासंदर्भातील पोलीसांचा अहवालाची सत्यप्रत **<u>निशाणी क्र.२५</u>** वर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>गैरअर्जदार क्र.१ तर्फे एकतर्फी असल्याने उलटतपास नाही.</u>**

**<u>उलटतपास– गैरअर्जदार क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री. एन.एच.पाचपोर यांचेमार्फत सुरु...</u>**

१३. हे म्हणणे खरे आहे की, दोन मोटरसायकलचा अपघात झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यापैकी एक मोटरसायकल माझ्या मालकीची होती आणि मी स्वतः ती चालवत होतो. माझ्या मोटरसायकलचा क्रमांक एम.एच.२८ एजी १७१३ असा होता. हे म्हणणे खरे आहे की, एकाही पोलीस पेपरमध्ये मोटरसायकल क्रमांक एम.एच. २८ ए जी १७१३ असा क्रमांक नाही. सीरीयल क्रमांक ए सी असा लिहीण्यात आलेला आहे. मोटरसायकलचा सीरीयल क्रमांक ए सी लिहील्याबद्दल मी स्वतः तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोटरसायकल क्रमांक एम.एच.२८ ए जी १७१३ ही अपघातामध्ये चालु नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मोटरसायकलचा विमा हा

गैरअर्जदार क्र.२ यांच्याकडे काढला होता आणि म्हणुन गैरअर्जदार क्र.२ यांना या प्रकरणामध्ये सामील केले आहे. (निशाणी क्र.२४ वरील विमा पॉलीसी गैरअर्जदार क्र.२ यांना मान्य असल्याचे सांगण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र.२ यांच्याशी विम्यासंदर्भात मी स्वतः करार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे हा दावा या न्यायालयासमोर दाखल करता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, समोरची मोटरसायकल दिलीप जाधव – गैरअर्जदार क्र.१ हा चालवत होता आणि मोटरसायकलचा क्रमांक एम.एच.२८ एडी ५७२२ असा होता.

१४. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्या दिवशीच माझा मुलगा अमोल याने पोलीस ठाण्यात दिलीप जयसिंग जाधव याच्याविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिलीप जाधव विरुध्द पोलीसांनी चौकशी करुन दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, दिलीप जाधव यांच्या निष्काळजीपणाने तो अपघात झाला आणि मी स्वतः माझी मोटरसायकल हळुवारपणे आणि नियमाचे पालन करुन चालवत होतो. हे म्हणणे खरे आहे की, अपघातासाठी माझी काही चुक नव्हती.

१५. मला दरमहा रुपये ४०००/– मिळायचे असा लेखी पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दरमहा रुपये ४०००/– रुपये कमवत होतो आणि माझ्या उपचारासाठी रुपये १,५०,०००/– खर्च झाल्याचे खोटे सांगत आहे. अपघातानंतर मला बुलडाणा येथील डॉ.सुभाष चव्हाण यांच्या दवाखान्यात दाखल करण्यात आले होते आणि त्या ठिकाणी मी १० तारखेपर्यंत दाखल होतो. तात्पुरते उपचार घेउन पुढे औरंगाबाद येथील दवाखान्यात १८ तारखेपर्यंत दाखल होतो.

१६. हे म्हणणे खरे नाही की, मला अपघातामुळे कायमचे अपंगत्व आले हे मी खोटे सांगत आहे. जानेवारी २०२१ मध्ये सरकारी दवाखान्यातुन मला कायम अपंगत्व असल्याबाबत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजही दैनंदिन कामकाज पुर्वीप्रमाणे करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी एका जागी बसुन

लिपीकाची कामे करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, खोटया माहितीच्या आधारे खोटा नुकसान भरपाईचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतीही नुकसार भरपाई देण्याची जबाबदारी गैरअर्जदार क्र.२ यांची नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पुरावा दिला व आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.03.30 16:26:41 +0530

दिनांक : ३०/०३/२०२२                    **(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.

वाचुन दाखवले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.03.30 16:26:47 +0530

दिनांक : ३०/०३/२०२२                    **(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.